SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी          संपादक : वैभव विवेक स्वामी

vaibhav11swami@gmail.com
beedshivvani@gmail.com
Mo.9422748792/ 9822628521

SB / BEED / RNP / 279 / 2026 - 2028

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक-४१ | सोमवार,दि.०५ ऑक्टोबर २०२६ | RNI-MAHMAR2003/14666 | किंमतः ३ रु. | पाने : ४

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -41 | Monday, Dt. 05-October-2026 | RNI-MAHMAR2003/14666 | Rupees - 3 Rs | PAGES - 4

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड ☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड ☎: 0220377, मो. 9405072777

# मराठवाड्यावर पुन्हा जलसंकटाचे सावट..!

## ५० टक्क्यांपेक्षाही कमी पावसाने धरणे आटली.. पिण्याचे पाणी, चारा आणि शेतीसमोर गंभीर आव्हान

## उपलब्ध जलसाठा पिण्यासाठी राखीव ठेवण्याची गरज, अवैध उपसा रोखून गावनिहाय 'वॉटर प्लॅन' तयार करण्याची वेळ..?

**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाड्यात यंदा वार्षिक सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस झाल्याने आगामी काळात गंभीर दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विभागातील अनेक सिंचन प्रकल्पांमध्ये अत्यल्प पाणीसाठा शिल्लक असून, उपलब्ध जलसाठा प्रामुख्याने पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्याची वेळ आली आहे. त्यामुळे प्रशासनासमोर आता केवळ पाणीपुरवठ्याचे नियोजन नव्हे, तर पुढील काही महिन्यांत निर्माण होणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.**

पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी चारा या दोन्ही बाबींना सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज निर्माण झाली आहे. उपलब्ध पाण्याचा अवैध उपसा तातडीने रोखला नाही आणि जलसाठ्याचे काटेकोर नियोजन केले नाही, तर उन्हाळ्यापूर्वीच अनेक गावांमध्ये पाणीटंचाई तीव्र होण्याची शक्यता आहे. शहरांबरोबरच ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याचे गावनिहाय सूक्ष्म नियोजन करणे अत्यावश्यक आहे. सध्या उपलब्ध असलेल्या जलस्रोतांमधून एखाद्या गावाला किती दिवस पाणीपुरवठा करता येईल, जलसाठा संपल्यानंतर पर्यायी स्रोत कोणते असतील आणि तेथून पाणी आणण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील, याचा आराखडा आतापासूनच तयार करणे गरजेचे आहे. महानगरपालिका क्षेत्रात संबंधित प्रशासनाने, तर ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने हा आराखडा तयार करून त्याची नियमित अंमलबजावणी व देखरेख करणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील उपलब्ध जलसाठा अत्यल्प असल्याने बेकायदा पाणीउपसा, अनधिकृत सिंचन आणि पाण्याचा अपव्यय यावर कठोर नियंत्रण आवश्यक आहे. महसूल, जलसंपदा, पोलीस, ग्रामविकास आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी समन्वयाने कार्यवाही करण्याची गरज आहे. उपलब्ध पाणी प्रत्येक थेंबाचा हिशेब ठेवून वापरण्याची वेळ आली आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य देत इतर वापरावर आवश्यक निर्बंध आणणे अपरिहार्य ठरणार आहे. संभाव्य टंचाईची तीव्रता लक्षात घेता प्रत्येक जिल्ह्यात टंचाई नियंत्रण कक्ष अथवा 'वॉर रूम' प्रभावीपणे कार्यान्वित करणे आवश्यक आहे.




### प्रत्येक थेंब जपला, तरच पुढील संकट टळेल..

पाऊस कमी झाला म्हणून दुष्काळ अचानक येत नाही पण उपलब्ध पाण्याचे नियोजन चुकले तर टंचाई मात्र अचानक उग्र रूप धारण करते. मराठवाड्याने यावेळी प्रत्येक थेंब जपला, तरच पुढील संकटाची तीव्रता कमी करता येईल..!

त्यासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करून गावागावातील पाणीस्थिती, टँकरची गरज, उपलब्ध जलस्रोत, चारा आणि पशुधनाची संख्या याचा दररोज आढावा घेणे गरजेचे आहे. मराठवाड्यातील पालकमंत्र्यांनी आपल्या जिल्ह्यातील पाणी व चारास्थितीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून तातडीने आढावा घेऊन आवश्यक निधी व उपाययोजनांसाठी राज्य आणि केंद्र शासनाकडे ◀◀ पान २ वर

## केंद्र सरकारचे मोठे निर्णय....



### रब्बी पिकांच्या हमीभावात वाढ; करडईला ६७५चा लाभ

नवी दिल्ली : केंद्र सरकारने रब्बी विपणन हंगाम २०२७-२८ साठी सहा पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. नव्या दरानुसार गव्हाचा हमीभाव प्रतिक्विंटल २,६१० रुपये, हरभरा ५,९५८ रुपये, मसूर ७,३९० रुपये, मोहरी-रॅपसीड ६,६१३ रुपये, बार्ली २,२८६ रुपये आणि करडई ७,२१५ रुपये करण्यात आला आहे. करडईला सर्वाधिक ६७५ रुपये, मोहरीला ४१३ रुपये आणि मसूरला ३९० रुपये प्रतिक्विंटल वाढ मिळाली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य मोबदला मिळण्यासह कडधान्ये व तेलबियांच्या लागवडीला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे.



### ग्रीन एनर्जी कॉरिडॉरसाठी १.८६ लाख कोटींची तरतूद

नवी दिल्ली : देशातील अक्षय ऊर्जा पारेषण व्यवस्था मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारने १,८६,४०५ कोटींच्या ग्रीन एनर्जी कॉरिडॉर फेज-३ योजनेला मंजुरी दिली आहे. या माध्यमातून १३५जीडब्ल्यू अक्षय ऊर्जा वाहून नेण्याची क्षमता निर्माण केली जाणार असून, ५० जीडब्ल्यूएच क्षमतेची बॅटरी ऊर्जा साठवणूक प्रणाली उभारण्यात येणार आहे. सौर व पवन ऊर्जेचा प्रभावी वापर, पारेषणातील अडथळे कमी करणे आणि वीजपुरवठा सुधारणे हा या योजनेचा उद्देश आहे. प्रकल्प २०३२-३३ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.



### दिल्लीतील ४२ मार्गांवर एआय सिग्नल प्रणाली

नवी दिल्ली : दिल्लीतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी केंद्र सरकारने १,७८९.५२ कोटी रुपयांच्या इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम (आयटीएमएस) प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या अंतर्गत ४२ प्रमुख वाहतूक मार्गांवर कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित स्मार्ट सिग्नल प्रणाली लागू केली जाणार आहे. तीन टप्प्यांत २४ महिन्यांत प्रकल्प पूर्ण होणार असून, वाहतुकीनुसार सिग्नलची वेळ बदलणे आणि रुग्णवाहिकांसारख्या आपत्कालीन वाहनांना प्राधान्याने मार्ग उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन रस्त्यांचा अधिक कार्यक्षम वापर होण्याची अपेक्षा आहे.



### दलहन-तिलहन खरेदीसाठी ५,५४८ कोटींची मंजुरी

नवी दिल्ली : बाजारभावातील घसरणीपासून शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी केंद्र सरकारने मूल्य समर्थन योजना (पीएसएस) अंतर्गत खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये दलहन-तिलहन खरेदीसाठी ५,५४७.९९ कोटी मंजूर केले आहेत. उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांतून एकूण ७.०६ लाख मेट्रिक टन खरेदीचे नियोजन असून, शेतकऱ्यांना उत्पादनाचे पैसे थेट बँक खात्यात जमा केले जाणार आहेत.

### साखर व्यापाऱ्यांच्या साठ्यावर केंद्राचे निर्बंध

नवी दिल्ली : सणासुदीच्या काळात साखरेचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि साठेबाजीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने साखर व्यापाऱ्यांची साठा मर्यादा ४,००० वरून २,००० क्विंटल केली आहे. हे निर्बंध १५ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत लागू राहतील. व्यापाऱ्यांना साखरेचा साठा ३० दिवसांपेक्षा अधिक काळ ठेवता येणार नाही. कोलकाता आणि विस्तारित महानगर क्षेत्रासाठी मात्र ४,००० क्विंटलची मर्यादा कायम ठेवण्यात आली आहे. दिवाळीसह सणासुदीच्या काळात वाढणारी मागणी लक्षात घेऊन बाजारात साखरेची उपलब्धता कायम ठेवणे आणि कृत्रिम टंचाई रोखणे, हा या निर्णयाचा उद्देश आहे.



## जलसेवा संकल्प अभियानात पाणी बचतीच्या जनजागृतीवर भर

### जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांमध्ये जलसाठा कमी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांचे आवाहन

**लातूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांमध्ये सद्यस्थितीत जलसाठा अत्यल्प आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले. जलसंपदा विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'जलसेवा संकल्प अभियानाला' जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे ◀◀ पान २ वर

## महसूल मंत्र्यांकडून दुष्काळग्रस्त शेतीची पाहणी

## दुष्काळग्रस्तांना भरीव मदत करणार - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**अकोला । प्रतिनिधी**

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत हेच शासनाचे प्राधान्य असून, त्यांना भरीव मदतीबरोबरच ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, पशुधनासाठी वैरण व्यवस्था, पेयजल व्यवस्था, जलसंधारणाची कामे व्यापक प्रमाणावर राबविण्यात येतील, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केले.**

महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेत दुष्काळजन्य परिस्थितीबाबत उपाययोजनांसाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागाचा प्रत्यक्ष दौरा पाहणी होत आहे. महसूल मंत्र्यांनी अकोला तालुक्यातील येवता व बाळापूर तालुक्यातील मानकी येथील दुष्काळग्रस्त परिसराची पाहणी केली, तसेच शासकीय विश्रामगृह येथे शेतकरी व नागरिकांकडून निवेदनेही स्वीकारली. ◀◀ पान २ वर

### शेतकरी बांधवांच्या पाठीशी संपूर्ण यंत्रणा

शेतकरी बांधवांनी या संकटात हिंमत सोडू नये. संपूर्ण यंत्रणा त्यांच्या पाठीशी आहे. शेतकरी बांधवांना सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### शेतकऱ्यांशी संवाद व शिदोरी जेवण...

येवता येथील शेतकरी शेख रशीद शेख इस्माईल, तसेच बाळापूर तालुक्यातील हरिश्चंद्र शिरसाठ यांच्या शेतात सोयाबीन पिकाच्या नुकसानाची पाहणी त्यांनी केली. शेख रजू शेख रशीद यांनी शेतात विहीर असतानाही पाण्याची कमतरता, भूजल पातळीतील घट याबाबत माहिती दिली. महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी देगाव शेतकरी बंधा-यावर संजय अवचार यांच्या शेतीमध्ये पाहणी करून शेतकऱ्यांसोबत शिदोरी जेवण त्यांनी घेतले. यावेळी अनेक पदाधिकारी, अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पीक पंचनाम्यांसाठी अफवांवर विश्वास न ठेवता यंत्रणांना सहकार्य करा

### जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांचे शेतकऱ्यांना आवाहन

सांगली । प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२६ मध्ये आटपाडी तालुक्यात 'कळ एक' लागू झाली असून, दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पीक पंचनाम्याची कार्यवाही शासनाच्या निर्देशानुसार वेगाने सुरू आहे. पंचनामे वेळेत पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता महसूल व कृषी विभागाच्या यंत्रणांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी केले.



नेलकरंजी व धावडवाडी येथे दुष्काळी परिस्थितीची पाहणी करताना ते बोलत होते. यावेळी विटा उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम बांदल, तहसीलदार शितल बंडगर, तालुका कृषी अधिकारी श्री. कौलगे यांच्यासह महसूल ◀◀ पान २ वर

## हिंगोलीत भूकंपाचे दोन धक्के; नागरिकांनी घाबरू नये

**हिंगोली । प्रतिनिधी**

**हिंगोली जिल्ह्यात सकाळी भूकंपाचे दोन धक्के जाणवले. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी जिल्ह्यातील परिस्थितीची सविस्तर माहिती घेतली असून, जिल्हा प्रशासनाने सतर्क राहून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.**

वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे परिसरात सकाळी ९.४३ वाजता ४.५ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली. या भूकंपाचे धक्के हिंगोली शहरासह

### पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांचे आवाहन; अफवांवर विश्वास न ठेवण्याच्या सूचना

जिल्ह्यातील विविध भागांत जाणवले. त्यापूर्वी औंढा नागनाथ तालुक्यातील गढाळा परिसरात सकाळी ७.४६ वाजता भूगर्भातून आवाजासह सौम्य धक्का जाणवला. या धक्क्याची नोंद ३.३ रिश्टर स्केल इतकी झाली. प्राथमिक माहितीनुसार, दोन्ही भूकंपाच्या धक्क्यांमुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. प्रशासनाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, आवश्यक त्या ठिकाणी पाहणी व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात येत आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अधिकृत माहितीसाठी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले आहे.

## बीड जिल्ह्यात पिण्याच्या पाणी स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण प्रभावीपणे राबवा

### शुद्ध व सुरक्षित पाण्यासाठी प्रशासनाचा पुढाकार; लाल-पिवळ्या कार्डधारक ग्रामपंचायतींवर विशेष लक्ष

**बीड । प्रतिनिधी**

**ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यात सार्वजनिक पाणीपुरवठा स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. पाणी स्त्रोतांची स्वच्छता, सुरक्षितता आणि गुणवत्तेचे नियमित परीक्षण करून जलजन्य आजारांचा धोका टाळण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना सुरू केल्या आहेत.**

आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली हे सर्वेक्षण करण्यात येत असून, प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर मुख्य जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आरोग्य कर्मचारी व जलसुरक्षक यांच्या सहभागातून पाणी स्रोत, परिसर आणि पाणीपुरवठा व्यवस्थेची पाहणी केली जात आहे. ग्रामस्थ तसेच ग्रामपंचायत सदस्य, विशेषतः महिला सदस्यांचा सहभाग घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. सर्वेक्षणातील गुणांकनानुसार पाणी स्रोतांचे तीव्र, मध्यम आणि सौम्य जोखीम अशा तीन श्रेणींत वर्गीकरण केले जाते. ७० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक जोखीम असल्यास तीव्र, ३१ ते ६९ टक्के मध्यम, तर ० ते ३० टक्के जोखीम असल्यास सौम्य किंवा कमी जोखीम मानली जाते. त्यानुसार ग्रामपंचायतींना लाल, पिवळे आणि हिरवे कार्ड दिले जाते. पाणी शुद्धीकरणातील अनियमितता, स्रोत परिसरातील अस्वच्छता, पाईपलाईन किंवा टाकीतील गळती, टी.सी.एल.चा अपुरा साठा अथवा जलजन्य आजारांचा उद्रेक आढळल्यास संबंधित ग्रामपंचायतींवर विशेष लक्ष केंद्रित केले जाते. तीव्र व मध्यम जोखीम असलेल्या स्रोतांवरील त्रुटी दूर करण्यासाठी एका महिन्याच्या आत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे बंधनकारक आहे. दरवर्षी १ ते ३० एप्रिल आणि २ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता सर्वेक्षण करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. जलसुरक्षक, ग्रामसेवक व आरोग्य कर्मचाऱ्यांना शास्त्रीय पद्धतीने प्रशिक्षण देण्यावरही भर देण्यात येत आहे. सलग पाच वर्षे जलजन्य साथीचा उद्रेक न झालेल्या आणि सलग पाच वर्षे हिरवे कार्ड मिळविणाऱ्या ग्रामपंचायतींना चंदेरी कार्ड देऊन गौरविण्याची तरतूद आहे. पाणी स्रोताभोवती अस्वच्छता होऊ नये, सांडपाणी साचू नये, पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती दूर करावी आणि पाण्याचे नियमित निर्जंतुकीकरण व तपासणी करावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास प. गंडाळ यांनी केले आहे. 'स्वच्छ पाणी-निरोगी समाज' या उद्दिष्टासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असेही त्यांनी म्हटले आहे.

# अग्रलेख....

## संपत्तीचा सवाल गंभीर..

### आरोपांचा धुरळा नव्हे, सत्याचा हिशेब हवा..!

मराठा आरक्षणाच्या आंदोलनामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात मोठे स्थान निर्माण झालेले मनोज जरांगे पाटील आणि त्यांच्या निकटवर्तीयांच्या आर्थिक व्यवहारांवरून सध्या सोशल मीडियापासून राजकीय-सामाजिक वर्तुळापर्यंत प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र हा विषय केवळ आरोप-प्रत्यारोपांपुरता मर्यादित न राहता कायद्याच्या कसोटीवर तपासला जाणे आवश्यक आहे.

अजय बारस्कर यांच्यासह काही व्यक्तींनी जरांगे यांच्या सहकाऱ्यांच्या कथित बेहिशेबी मालमत्ता, जमीन व्यवहार, वाळू व्यवसाय, सरकारी कंत्राटे आणि आंदोलनाच्या खर्चाबाबत ईडीकडे तक्रारी केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. तक्रारींमध्ये शेकडो कोटी रुपयांच्या व्यवहारांचे दावे करण्यात आले आहेत. मात्र हे आकडे अद्याप तपासातून सिद्ध झालेले नाहीत, हे तितकेच सत्य आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, १ ऑक्टोबर २०२६ पर्यंतच्या उपलब्ध वृत्तांनुसार ईडीने या तक्रारींच्या आधारे ढ-१ स्तरावर गुप्तवार्ता चौकशी सुरू केली असून तक्रारदारांचे जबाब, कागदपत्रे आणि पुरावे मागवले आहेत. आयकर विभागासह अन्य सरकारी यंत्रणांकडूनही माहिती घेतली जात असल्याचे वृत्त आहे. जमीन व्यवहार, कथित बेनामी मालमत्ता, सरकारी कंत्राटे, आर्थिक व्यवहार आणि आंदोलनाशी संबंधित खर्च यांचा तपासाच्या कक्षेत समावेश असल्याचे सांगितले जात आहे. पण इथेच एक अत्यंत महत्त्वाची रेषा ओढावी लागेल.चौकशी सुरू होणे म्हणजे गैरव्यवहार सिद्ध होणे नव्हे. उपलब्ध वृत्तांनुसार अद्याप मनी लॉंड्रिंगचा औपचारिक गुन्हा किंवा एउखठ दाखल झाल्याचे स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे सोशल मीडियावरील आरोपांना थेट सत्य मानणेही चुकीचे आणि तपास यंत्रणांच्या चौकशीकडे दुर्लक्ष करणेही चुकीचे.

मग प्रश्न नेमका आहे कुठे..?

जर एखाद्या व्यक्तीच्या नावावर अचानक मोठ्या प्रमाणात जमीन, महागडी वाहने किंवा इतर मालमत्ता आली असेल, तर तिचा कायदेशीर आणि पारदर्शक उत्पन्नाचा स्रोत काय ? हा प्रश्न विचारणे गैर नाही. उलट सार्वजनिक जीवनात सक्रिय असलेल्या व्यक्तींविषयी आर्थिक पारदर्शकतेची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. तक्रारींमध्ये पांडुरंग तारक यांच्याशी संबंधित ५० आणि २८ एकर जमीन व्यवहार, महागड्या वाहनांचा वापर, काही व्यक्तींच्या मालमत्ता आणि आंदोलनाशी संबंधित आर्थिक खर्चाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. हे तक्रारदारांचे आरोप आहेत. ते न्यायालयीन किंवा तपासातून सिद्ध झालेले तथ्य म्हणून मांडता येणार नाहीत. याउलट, जरांगे यांचे सहकारी गंगाधर काळकुटे यांनी आरोप फेटाळून लावत कोणत्याही तपासाला सामोरे जाण्याची तयारी व्यक्त केली आहे. त्यामुळे आता आरोप करणाऱ्यांनी पुरावे द्यावेत आणि संबंधितांनी आपल्या संपत्ती व आर्थिक व्यवहारांचे स्पष्टीकरण द्यावे,यातूनच सत्य बाहेर येईल. मराठा आरक्षणाचा प्रश्न हा लाखो कुटुंबांच्या भवितव्याशी जोडलेला संवेदनशील विषय आहे. त्यामुळे आंदोलनाच्या पवित्र उद्देशावर आर्थिक संशयाची सावली पडत असेल, तर त्याची निष्पक्ष, दस्तऐवजाधारित आणि कायदेशीर चौकशी होणे गरजेचे आहे. ईडी असो, आयकर विभाग असो किंवा अन्य सक्षम यंत्रणा चौकशी पूर्ण करा, मालमत्तेचा स्रोत तपासा, व्यवहारांची साखळी तपासा आणि सत्य जनतेसमोर ठेवा. दोष नसेल तर आरोप करणाऱ्यांचे दावे खोटे ठरतील.गैरव्यवहार आढळला तर कायद्याने कारवाई झाली पाहिजे. कारण अखेर प्रश्न मनोज जरांगे पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचा नाही. प्रश्न आहे सार्वजनिक आंदोलनाच्या नावाने झालेल्या प्रत्येक रुपयाच्या व्यवहाराचा हिशेब पारदर्शक आहे की नाही, याचा.

आंदोलन मोठे असेल तर हिशेबही स्वच्छ असला पाहिजे ?

आरोप मोठे असतील तर पुरावेही तितकेच ठोस असले पाहिजेत. आणि तपास सुरू झाला असेल तर निकाल येईपर्यंत ना आरोपांना सत्य मानावे, ना चौकशीला दडपण्याचा प्रयत्न व्हावा. जनतेला धुरळा नको, सत्य हवे आहे. आरोप नकोत,पुराव्यांसह अंतिम हिशेब हवा आहे..!

# • महात्मा गांधी : वन मॅन आर्मी •



**महात्मा गांधींचे नाव घेतले की, आपल्या डोळ्यांसमोर हातात काठी घेतलेला, पंचा नेसलेला, कृश देहयष्टीचा आणि चेहऱ्यावर विलक्षण शांत हास्य असलेला एक माणूस उभा राहतो. त्यांच्याकडे ना बंदूक होती, ना सैन्यदल ना सत्ता होती, ना राज्ययंत्रणा. तरीही विसाव्या शतकातील सर्वांत शक्तिशाली साम्राज्याला आव्हान देणाऱ्या या माणसाला इतिहासाने असामान्य नैतिक शक्तीचा नेता म्हणून स्थान दिले. म्हणूनच महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्वाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले, तर त्यांना तत्कालीन व्यवस्थेत 'वन मॅन आर्मी' असे म्हणण्यामागचा अर्थ लक्षात येतो.**

२ ऑक्टोबर गांधी जयंतीला या महामानवाला अभिवादन करताना निद्रिस्त देशाला त्याच्या हक्काची जाणीव निर्माण करून संघर्ष करायला उभे करणाऱ्या या चेतनापुरुषापुढे प्रत्येक भारतीयाने आदराने नतमस्तक होणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. मात्र येथे 'वन मॅन आर्मी' म्हणजे शस्त्र हातात घेऊन लढणारा एकटा सैनिक नव्हे. उलट, शस्त्राशिवाय हजारो निराधार, नि:शस्त्र, गरीब लोकांमध्ये लढण्याचे बळ निर्माण करणारा महापुरुष म्हणजे महात्मा गांधी. ज्यांचा कुणी नेता नाही, ज्यांच्या अन्यायाला वाचा नाही, ज्यांच्याकडे कोणतेही साधन-साहित्य-सामग्री नाही, अशा समुदायाला संघर्ष करण्याची शक्ती निर्माण करणारा एक माणूस, असा त्याचा अर्थ आहे. कारण गांधीजींची सेना होती सत्याची त्यांचे शस्त्र होते अहिंसा त्यांची ढाल होती करुणा,त्यांची ताकद होती संयम आणि त्यांचे सर्वांत मोठे सामर्थ्य होते माणसाच्या अंतःकरणावरील विश्वास. या एका महामानवाने अत्यंत विदारक परिस्थितीमध्ये सर्व जाती धर्म गुण्यागोविंदाने नांदतील अशा भारताची स्वप्ने बघितली होती. नव्हे त्याची बीजे स्वतःच्या जीवनशैलीतून पेरली होती. आज भारत त्यांनी पेरलेल्या सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर उभा राहिला आहे. एका माणसाने आपल्या समर्थकांच्या, अनुयायांच्या हजारो हातांनी हा देश उभा केला. म्हणून गांधी वन मॅन आर्मी आहेत.

**गांधींना 'महात्मा' ही उपाधी कोणी दिली..?**

रवींद्रनाथ टागोर यांनी १९१५ मध्ये गांधींना 'महात्मा' म्हटले. गांधी स्मृतीच्या माहितीनुसार नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४ जून १९४४ रोजी आझाद हिंद रेडिओवरून गांधींना 'ऋींहशी ेष ींहश छर्ीींळेप' म्हणून संबोधले. राष्ट्रपिता म्हटले. परंतु 'जपश-चरप ईंपवरीू ऋेलश' हा उल्लेख या लेखाच्या शीर्षकाशी अधिक जवळचा आहे. भारताच्या फाळणीच्या काळात एकीकडे पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणावर सैन्य तैनात असूनही हिंसा सुरू होती. त्याच वेळी दुसरीकडे गांधीजी कलकत्त्यात हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी काम करीत होते. २६ ऑगस्ट १९४७ रोजी लॉर्ड माउंटबॅटन यांनी गांधीजींना लिहिलेल्या पत्रात पंजाबमधील ५५ हजार सैनिकांचा संदर्भ देत बंगालमध्ये 'पश-ारप' अशी एक आपली शक्ती असल्याचे नमूद केले. त्यांचा इशारा गांधीजींकडे होता. त्यांच्या बंगाल प्रांतातील एकट्या लढ्याकडे होता. गांधीजींना जपश-चरप ईंपवरीू ऋेलश म्हणून त्यांनी त्या विदारक परिस्थितीत आदरांजली अर्पण केली. त्यामुळे ही उपमा का महत्त्वाची आहे, हे कलकत्त्याच्या घटनांमधून समजते. १९४७ च्या ऑगस्टमध्ये कलकत्ता सांप्रदायिक हिंसेच्या छायेत होता. गांधीजींनी सुरक्षित जागा शोधण्याऐवजी हिंसाग्रस्त भागात जाण्याचा निर्णय घेतला. १३ ऑगस्टला ते हुसैन शहीद सुहरावर्दी यांच्यासह बेलियाघाटा येथील हैदरी मॅन्शनमध्ये राहायला गेले. हा परिसर त्या वेळी तणावग्रस्त होता. गांधींच्या प्रार्थना, संवाद आणि प्रत्यक्ष लोकांमध्ये जाण्याच्या प्रयत्नांचा तेथील हिंसेवर परिणाम झाला. 'गांधी हेरिटेज पोर्टल ' या कालखंडाला कलकत्त्यातील 'चळीरलश्रशेष उरश्रलीीीर' म्हणून नोंदवते. इथे गांधीजींच्या 'वन मॅन आर्मी'चे खरे स्वरूप दिसते. त्यांनी सैन्य उभे केले नाही त्यांनी माणसाच्या विवेकाला जागे करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विरोधकाला शत्रू मानले नाही. त्याच्या अंतःकरणाला आवाहन केले. त्यामुळे त्यांचा संघर्ष केवळ राजकीय नव्हता; तो माणसाच्या मनावर चालणारा संघर्ष होता.

**दक्षिण आफ्रिकेतील पाळेमुळे..**

या शक्तीची मुळे दक्षिण आफ्रिकेत सापडतात. १८९३ मध्ये पीटरमार्टिझबर्ग येथे वैध तिकीट असूनही वर्णभेदामुळे गांधींना रेल्वेच्या डब्यातून बाहेर फेकण्यात आले. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांवरील भेदभावाविरुद्ध त्यांनी संघर्ष उभारला. याच काळात सत्याग्रहाची संकल्पना आकाराला आली. सत्याग्रह म्हणजे केवळ सरकारविरुद्ध आंदोलन नव्हते. गांधींच्या दृष्टीने सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह आणि अन्यायाविरुद्ध अहिंसक प्रतिकार. त्यामध्ये विरोधकाचा विनाश नव्हता; त्याच्या विवेकाला जागवण्याचा प्रयत्न होता. म्हणूनच गांधींची अहिंसा ही निष्क्रियता नव्हती. ती कृतीची, धैर्याची आणि आत्मसंयमाची पद्धत होती.

**दांडी मार्च प्रभावी उदाहरण..**

दांडी मार्च हा त्याचा अत्यंत प्रभावी नमुना. १२ मार्च १९३० रोजी गांधी ७९ सहकाऱ्यांसह साबरमतीहून दांडीकडे निघाले. ब्रिटिश साम्राज्याच्या दृष्टीने क्षुल्लक वाटणाऱ्या मिठाच्या कायद्याला त्यांनी साम्राज्यविरोधी जनआंदोलनाचे प्रतीक बनवले. पुढे हजारो लोक या आंदोलनात सहभागी झाले. दांडी मार्चने सत्य आणि अहिंसेच्या नैतिक शक्तीला व्यापक जनशक्तीत रूपांतरित केले. म्हणूनच गांधीजींची 'सेना' ही संख्येची नव्हती; ती विश्वासाची होती. त्यांच्या एका आवाहनाने सामान्य माणूस मिठाचा कायदा मोडण्यासाठी समुद्राकडे निघाला. त्यांच्या एका आवाहनाने परदेशी वस्त्रांचा त्याग झाला. त्यांच्या एका आवाहनाने लाखो लोक स्वातंत्र्याच्या संघर्षात सहभागी झाले. त्यांनी रायफल किंवा मशीनगनच्या शक्तीऐवजी सामान्य माणसामध्ये असलेल्या नैतिक शक्तीला जागृत केले. याच कारणामुळे गांधीजींचा प्रभाव भारताच्या सीमा ओलांडून गेला.

**जगभरात गांधीजींचे अनुयायी...**

जगामध्ये सर्वाधिक पुतळे विविध देशांत असणारे एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे महात्मा गांधी. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीचे नेते मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर, दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला आणि इतर अनेक नेत्यांवर गांधींच्या विचारांचा प्रभाव पडला. राष्ट्रपतींच्या संदेशातही गांधींच्या विचारांनी किंग, मंडेला आणि इतर जागतिक नेत्यांना प्रभावित केल्याचे नमूद आहे. गोलमेज परिषदेला जेव्हा गांधीजी लंडनला गेले त्यावेळी ब्रिटनमधील नागरिक त्यांना बघायला रस्त्यांवर गर्दी करत. प्रचार-प्रसाराचा तो काळ नव्हता. आपल्या विरोधकांच्या मनामध्ये देखील त्यांनी या देशाबद्दल आत्मीयता निर्माण करण्याचे काम आपल्या वर्तनातून केले. अल्बर्ट आइनस्टाइन यांनी गांधींबद्दल केलेले प्रसिद्ध विधानही त्यांच्या जागतिक प्रभावाचे द्योतक आहे. अशा प्रकारचा माणूस प्रत्यक्ष रक्तामांसात या पृथ्वीवर चालत होता, यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणे कठीण जाईल. गांधींच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे करुणा. त्यांच्यासाठी अहिंसा केवळ राजकीय तंत्र नव्हते. ती जीवनपद्धती होती. शब्दांतही हिंसा नको, विचारांतही हिंसा नको, विरोधकाबद्दलही द्वेष नको-अशी त्यांची भूमिका होती. विरोधकांमधल्या गुणवानांचीही कदर कशी करावी हे गांधींनी आपल्या पूर्ण आयुष्यात दाखवून दिले. त्यामुळे त्यांचे पक्के विरोधकही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रेमात असायचे.

**बिकट परिस्थितीला सामोरे जाणारे व्यक्तिमत्त्व..**

नोआखली असो, बिहार असो किंवा कलकत्ता-गांधी हिंसेच्या केंद्रात गेले. १९४६-४७ च्या सांप्रदायिक हिंसेच्या काळात ते लोकांमध्ये राहिले, पायी फिरले, प्रार्थना केली, संवाद साधला आणि गरज पडली तेव्हा उपोषण केले. नोआखलीत त्यांचा पदयात्रेचा कालखंड हा त्यांच्या अहिंसक शांतता-प्रयत्नांचा महत्त्वाचा अध्याय आहे. याच ठिकाणी 'वन मॅन आर्मी' या शब्दाचा खरा अर्थ स्पष्ट होतो. जगात युद्धे जिंकण्यासाठी सैन्य असतात; पण माणसांच्या मनातील द्वेषावर विजय मिळवण्यासाठी कोणते सैन्य असते? गांधीजींनी या प्रश्नाचे उत्तर आपल्या आचरणातून दिले. त्यांनी सांगितले की शत्रूला पराभूत करण्यापेक्षा त्याच्या मनातील शत्रुत्व बदलणे अधिक मोठा विजय आहे. आज जग पुन्हा हिंसा, युद्ध, द्वेष आणि असहिष्णुतेच्या प्रश्नांशी झुंजत आहे. अशा वेळी गांधीजींचे महत्त्व केवळ इतिहासातील एका स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यापुरते मर्यादित राहत नाही. त्यांची पद्धत आपल्याला वेगळा प्रश्न विचारते-शस्त्रांनी शांतता निर्माण करता येते का, की शांततेसाठी माणसाच्या अंतःकरणाला स्पर्श करणारी नैतिक शक्ती आवश्यक असते? गांधींचे उत्तर स्पष्ट होते. त्यांनी १९२० मध्ये र्धेीपस खपवळर मध्ये अहिंसेला मानवजातीच्या सर्वांत मोठ्या शक्तींपैकी एक मानले. त्यांच्या दृष्टीने अहिंसा म्हणजे दुर्बलतेचा स्वीकार नव्हता; ती अन्यायाला न झुकता, अन्याय करणाऱ्याविषयीही द्वेष न बाळगता लढण्याची शक्ती होती. म्हणूनच महात्मा गांधींना 'वन मॅन आर्मी' म्हणणे ही शस्त्रबळाची उपमा नाही; ती नैतिक शक्तीची उपमा आहे. एका माणसाने स्वतःभोवती बंदुका जमवल्या नाहीत; त्यांनी माणसे जोडली. त्यांनी सैन्य उभे केले नाही; त्यांनी समाजाच्या विवेकाला जागे केले. त्यांनी हिंसेला हिंसेने उत्तर दिले नाही; त्यांनी सत्य, अहिंसा आणि करुणेला संघर्षाचे सामर्थ्य बनवले. म्हणूनच माउंटबॅटन यांनी कलकत्त्यातील त्या विलक्षण परिस्थितीत गांधींना 'जपश-चरप ईंपवरीू ऋेलश' म्हटले, ही घटना गांधींच्या जीवनातील केवळ एक प्रशंसात्मक नोंद नाही. ती त्यांच्या नेतृत्वाच्या एका अद्वितीय स्वरूपाची ऐतिहासिक साक्ष आहे. गांधींची सेना माणसांची होती; तिचे शस्त्र सत्य होते, तिची शक्ती अहिंसा होती आणि तिचे अंतिम ध्येय माणुसकी होते. म्हणूनच गांधी केवळ अहिंसेचे पूजारी नव्हते; ते अहिंसेला संघर्षाची शक्ती बनवणारे 'वन मॅन आर्मी' होते.

**प्रवीण टाके**
उपसंचालक,
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर.
मो.९७०२८५८७७७



मुंबई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबई येथे 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस'निमित्त 'मराठीचिये कौतुके भाग - २' या पुस्तकाचे प्रकाशन केले. देश-विदेशात मराठी भाषा व संस्कृतीचे जतन करणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळातील पदाधिकाऱ्यांच्या आकाशवाणी वरील मुलाखतींचा या पुस्तकात संग्रह करण्यात आला आहे.यावेळी मंत्री उदय सामंत, मुंबईच्या महापौर रितू तावडे, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. हेमलता बागला व इतर मान्यवर उपस्थित होते.

## बीड जिल्ह्यात सुरक्षित अन्न व पोषक आहार समितीची बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सुरक्षित अन्न व पोषक आहार जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे पार पडली. या बैठकीमध्ये नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित अन्न व संतुलित आहार मिळावा यासाठी विविध महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत अन्न व्यावसायिकांनी अन्न सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, याबाबतचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले आहेत. तसेच आगामी काळात शालेय विद्यार्थी आणि अंगणवाडीतील बालकांना मिळणाऱ्या 'मिड डे मील' (चळव ऊू चशरश्र) ची योग्य तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पोषक व सुरक्षित अन्न पुरविण्यास उत्तेजन देऊन योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचनाही यावेळी संबंधितांना देण्यात आल्या. तसेच, आगामी सणासुदीच्या काळात अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य ती कार्यवाही व मोहीम राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या बैठकीस जिल्हाधिकारी विवेक जॉनन्स यांच्यासह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. के. पिंगळे, जिल्हा पुरवठा अधिकारी वधू प्रधाताटे, जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी प्रा. डी. आर. शिंदे, जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयीन प्रतिनिधी चंद्रकांत पांडव, जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेचे सचिन दोडके, अन्न सुरक्षा अधिकारी अ. भ. गाढे आणि अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त तथा समितीचे सदस्य सचिव नि. दि. मोहिते आदी अधिकारी उपस्थित होते.

## महात्मा गांधी, लालबहादुर शास्त्री जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.



यावेळी उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, तहसिलदार, नायब तहसिलदार व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात स्वच्छता मोहीम









**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'स्वच्छता हीच सेवा' या संकल्पनेतून स्वच्छता, स्वच्छ परिसर व निरोगी जीवनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी, बीड यांनी स्वतः स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.**

जिल्हाधिकारी यांनी आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात झाडू हाती घेत स्वच्छता करत अभियानाची सुरुवात केली. त्यांच्या या कृतीने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या स्वच्छता मोहिमेत जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यालय परिसर स्वच्छ केला. तसेच जिल्हा रुग्णालय, बीड येथेही स्वच्छता मोहीम राबवण्यात आली असून, रुग्णालय परिसरातील कचरा काढून स्वच्छता करण्यात आली. स्वच्छतेमुळे आरोग्य सुरक्षित राहते, त्यामुळे प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# पान १ वरून....

### मराठवाड्यावर पुन्हा जलसंकटाचे सावट..!

पाठपुरावा करणे आवश्यक आहे. राज्य शासनाने दुष्काळग्रस्त भागांसाठी जाहीर केलेल्या सवलतींची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. पीक नुकसानीचे पंचनामेही गतीने पूर्ण करण्याची गरज आहे. पीक कापणी प्रयोगातून उत्पादनात मोठी घट दिसून येत असल्याने पंचनामे करताना शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष नुकसानीची संवेदनशीलपणे नोंद घेणे महत्त्वाचे ठरणार आहे. शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ वेळेत मिळाला नाही, तर आर्थिक संकट अधिक तीव्र होण्याची भीती आहे. पाणीटंचाईसोबतच पशुधनासाठी चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात उपलब्ध चारा जिल्ह्याबाहेर जाऊ नये यासाठी निर्बंध घालण्यात आले असले तरी डिसेंबरनंतरची परिस्थिती काय असेल, याचे नियोजन आतापासूनच करणे आवश्यक आहे. पशुपालकांसमोर 'पशुधन जगवायचे कसे ?' हा प्रश्न उभा राहू नये, यासाठी चारा छावण्या, चारा डेपो, पशुधनासाठी पाण्याची उपलब्धता आणि आवश्यक पशुवैद्यकीय सेवा यांचे पूर्वनियोजन करण्याची गरज आहे. मराठवाड्यातील अनेक प्रकल्पांमध्ये पाणीपातळी चिंताजनक असल्याने नागरिकांनीही प्रशासनाच्या उपाययोजनांना सहकार्य करणे गरजेचे आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे, अनावश्यक वापर बंद करणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही आता प्रत्येकाची जबाबदारी आहे. मराठवाड्यासमोरील संकट केवळ आजच्या पाणीटंचाईचे नाही पुढील काही महिन्यांच्या पिण्याच्या पाण्याचे, पशुधनाच्या चाऱ्याचे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वाचे आहे. त्यामुळे संकट दारात येण्याची वाट न पाहता प्रशासनाने आजच युद्धपातळीवर नियोजन करणे आवश्यक आहे.

----------

### महसूल मंत्र्यांकडून दुष्काळग्रस्त शेतीची पाहणी

यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या व त्यांना दिलासा दिला. राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ड आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, महापौर शारदा खेडकर आदी उपस्थित होते. महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, केंद्र शासनाची अधिकाधिक मदत मिळण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचे निकष लक्षात घेऊन अचूक पंचनामे होणे गरजेचे असते. त्यामुळे पंचनामे जलदपणे व अचूक पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला त्यांनी दिले. पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा-पाणी, पीक पंचनामे आणि शेतीसाठी पाणीपुरवठा यांना प्राधान्य देत प्रशासकीय यंत्रणेने युद्धपातळीवर व समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. केंद्र शासनाच्या मदतीबरोबरच राज्य शासनाची भरीव मदत व पीक विमा योजना व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी, तसेच रोजगार निर्मिती व जलसंधारणाची अधिकाधिक कामे राबविण्यात येतील. पेयजल उपलब्धतेच्या दृष्टीने पाण्याचे योग्य नियोजन करण्यात येईल. 'गावातले पाणी गावात, शिवारातले पाणी शिवारात' अशा पद्धतीने पाण्याचा थेंबनथेंब वाचविण्याचे दृष्टीने ग्रामीण भागात जलसंधारणाची कामे व्यापक प्रमाणावर राबवण्यात येतील. दुष्काळामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन व संपूर्ण यंत्रणा भक्कमपणे उभी आहे. जिल्हा नियोजन निधीचा दुष्काळ निवारणासाठी प्रभावी वापर करण्यात येईल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. बँकांनी शेतकऱ्यांची व्यथा जाणून संपूर्ण सहकार्य करावे. त्यांना कुठलाही त्रास होता कामा नये. दुष्काळी परिस्थितीत बँकांनी कोणत्याही शेतकऱ्याकडे कर्ज वसुलीसाठी सक्तीचा तगादा लावू नये. अवैध सावकारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक किंवा फसवणूक होत असल्यास, नागरिकांनी न घाबरता यंत्रणेकडे थेट अर्ज करावा, असे त्यांनी सांगितले.

---------------

### जलसेवा संकल्प अभियानात

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, लातूर लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या प्रशासक तथा अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता महेंद्र काळे, मयूर महाजन, मधुमती तोरणाळे, नागेश व्हट्टे, महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना जलजागृतीची शपथ देण्यात आली. अभियानाच्या निमित्ताने पाण्याच्या काटकसरीने वापराबाबत जनजागृती करण्यासाठी जलसंपदा विभागाच्या वतीने मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केले. रॅलीच्या माध्यमातून 'पाणी वाचवा, पाणी जपून वापरा' तसेच उपलब्ध जलसाठ्याचा योग्य आणि काटकसरीने वापर करण्याचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

------------

### पीक पंचनाम्यांसाठी अफवांवर

व कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि शेतकरी उपस्थित होते. शासनाच्या सूचनेनुसार १० दिवसांत पीक पंचनाम्याचे काम पूर्ण करायचे आहे. काही शेतकऱ्यांकडून विविध कागदपत्रांची मागणी होत असल्याच्या तक्रारी निदर्शनास आल्या. याबाबत स्पष्ट करताना जिल्हाधिकारी घोष यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी केवळ आधार कार्ड, ७/१२ उतारा, बँक पासबुकची छायांकित प्रत आणि फार्मर आयडी ही कागदपत्रे द्यावीत. पंचनाम्याची उर्वरित कार्यवाही शासकीय यंत्रणेकडून करण्यात येणार असून, त्यासाठी शेतकऱ्यांना वैयक्तिकरीत्या कोणतीही अतिरिक्त कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्यस्थिती, नुकसानीचे प्रमाण तसेच पिण्याचे पाणी आणि चाऱ्याच्या उपलब्धतेबाबतच्या अडचणी जाणून घेतल्या. संबंधित यंत्रणांनी पंचनाम्याची कार्यवाही निर्धारित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

---------------

cmyk

SHIV VANI
शिव वाणी
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी



## महाराष्ट्र शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय...

### कृषी : रब्बी हंगामासाठी डेटा-आधारित नियोजनावर भर

नवी दिल्ली : आगामी रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने डेटा-आधारित नियोजन, वेळेत बियाणे-खते उपलब्ध करून देणे आणि वैज्ञानिक पद्धतीने पिकांचे निरीक्षण करण्यावर भर दिला आहे. राष्ट्रीय रब्बी अभियानाच्या बैठकीत कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राज्यांनी पाणी उपलब्धता, जमिनीतील ओलावा, पिकांची स्थिती आणि स्थानिक हवामानाचा विचार करून नियोजन करण्याचे आवाहन केले. कमी व असमान पावसामुळे यंदा रब्बी पिकांसाठी जमिनीतील ओलावा महत्त्वाचा ठरणार आहे. गहू, हरभरा, मोहरीसह अन्य पिकांची वेळेत पेरणी होण्यासाठी बियाणे व खतांची उपलब्धता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला. सिंचन, दर्जेदार बियाणे आणि वेळेवर पेरणी हे उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी निर्णायक घटक ठरणार आहेत.



### कृषी : दलहन-तिलहन खरेदीसाठी ५,५४७ कोटी

नवी दिल्ली : खरीप विपणन हंगाम २०२६-२७ मध्ये दलहन व तेलबियांची एमएसपीवर खरेदी करण्यासाठी केंद्र सरकारने ५,५४७.९९ कोटींच्या निधीला मंजुरी दिली आहे. मूल्य समर्थन योजना (पीएसएस)अंतर्गत उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणात तूर, मूग, सोयाबीन व सूर्यफूल या पिकांची खरेदी केली जाणार आहे. शेतकऱ्यांना बाजारभावातील घसरणीपासून आधार मिळावा आणि दलहन-तिलहन उत्पादनाला चालना मिळावी, हा या निर्णयाचा उद्देश आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठीही सरकारी खरेदी महत्त्वाची ठरणार आहे. संबंधित राज्यांमध्ये खरेदी प्रक्रिया वेळेत सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.




### कृषी : रब्बीसाठी केंद्राचा 'टीम ॲग्रिकल्चर'वर भर

नवी दिल्ली : रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने केंद्र-राज्य समन्वयातून 'टीम ॲग्रिकल्चर'च्या माध्यमातून कृषी विकासाला गती देण्यावर भर दिला आहे. कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी उत्पादन वाढीसोबत शेतकऱ्यांचे उत्पन्न, बाजारपेठ, साठवणूक आणि कृषी मूल्यसाखळी मजबूत करण्याची गरज व्यक्त केली. पेरणीपूर्व तयारी, बियाणे-खतांची उपलब्धता, सिंचन व्यवस्था आणि हवामानानुकूल पीक पद्धतींवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन करण्यात आले. सरकारी योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचविण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी नियोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.



### आयकर रिटर्नची मुदत २१ नोव्हेंबरपर्यंत वाढली

नवी दिल्ली : ऑडिटच्या कक्षेत येणाऱ्या करदात्यांना दिलासा देत केंद्र सरकारने मूल्यांकन वर्ष २०२६-२७ साठी आयकर रिटर्न भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबरवरून २१ नोव्हेंबर २०२६ केली आहे. तसेच ऑडिट रिपोर्ट सादर करण्याची मुदत ३० सप्टेंबरवरून २१ ऑक्टोबर २०२६ करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित करदात्यांना लेखापरीक्षण व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार आहे.




### वाहनांची इंधन कार्यक्षमता वाढणार; नवे सीएएफइ नियम लागू

नवी दिल्ली : देशातील प्रवासी वाहनांची इंधन कार्यक्षमता वाढविण्यासाठी केंद्र सरकारने नवीन सीएएफइ (कॉर्पोरेट सरासरी इंधन कार्यक्षमता) मानके अधिसूचित केले आहेत. हे नियम १ एप्रिल २०२७ ते ३१ मार्च २०३२ या कालावधीत लागू राहणार आहेत. नव्या नियमांत पाच वर्षांत वाहनांच्या इंधन कार्यक्षमतेत सुमारे १६.७ टक्के सुधारणा करण्याचे लक्ष्य आहे. २०२७-२८ मध्ये ३.९९६ लिटर प्रति १०० किलोमीटर असलेला इंधन वापराचा बेंचमार्क २०३१-३२ पर्यंत ३.३२७३ लिटर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. भारतात विक्रीसाठी तयार किंवा आयात होणाऱ्या नव्या प्रवासी वाहनांना हे नियम लागू असतील.

## मराठी ही केवळ संवाद आणि भाषा नव्हे, तर संस्कृती-इतिहासाची साक्षीदार

# डिजिटल युगात मराठीला ज्ञानभाषा करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

**मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती आपल्या समृद्ध संस्कृतीची वाहक आणि जाज्वल्य इतिहासाची साक्षीदार आहे. विपुल शब्दसंपदा, समृद्ध साहित्यपरंपरा आणि विविध बोलीभाषांचा वारसा लाभलेल्या मराठीला २१ व्या शतकात डिजिटल आणि ज्ञानभाषा म्हणून अधिक सक्षम करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

मराठीचा दैनंदिन व्यवहारातील वापर वाढविण्यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), डिजिटल तंत्रज्ञान, क्वांटम कॉम्प्युटिंग, स्पेस टेक्नॉलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजीसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही मराठीचा वापर वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' आणि 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस' कार्यक्रमाचा चर्चगेट येथील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकर्सी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात उत्साहात शुभारंभ झाला. यावेळी आयोजित विशेष सोहळ्यात फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, मुंबईच्या महापौर रितू तावडे, विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. हेमलता बागला, मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांच्यासह मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि मराठीप्रेमी उपस्थित होते.



**मराठीला अभिजात भाषेचा दर्जा हा अभिमानाचा क्षण...**

मराठी भाषा प्राचीन आणि अभिजात आहेच मात्र तिला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेची अधिकृत मान्यता मिळणे हा मराठी भाषकांसाठी अभिमानाचा क्षण असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या भाषिक आणि सांस्कृतिक वारशाला राष्ट्रीय पातळीवर विशेष अधोरेखित स्थान मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संकल्पनेसोबत स्वभाषेलाही महत्त्व दिले. राज्यकारभारात मराठीचा वापर वाढविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यातून मराठीच्या प्रशासकीय वापराला नवी दिशा मिळाली, अशी आठवणही फडणवीस यांनी यावेळी करून दिली.

**मराठी शब्दसंपदा वाढविण्याची गरज..**

जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा १३ वा क्रमांक असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मराठी ही जागतिक स्वरूपाची भाषा आहे. विसाव्या शतकात तयार झालेल्या मराठी ज्ञानकोश आणि शब्दरत्नाकरामध्ये ११ ते १३ लाख शब्द असल्याचा उल्लेख त्यांनी केला. तुलनेत ऑक्सफर्ड शब्दकोशात सुमारे सहा लाख शब्द, तर मँडरिन, स्पॅनिश आणि फ्रेंचसारख्या भाषांमध्ये साधारण तीन ते साडेतीन लाख शब्द असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाच्या प्रकाशित मराठी शब्दकोशात सध्या सुमारे तीन लाख शब्द आहेत. त्याच्या पुढील आवृत्त्या तयार करून शब्दसंपदा १३ लाख शब्दांपर्यंत नेण्याचे काम करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी यावेळी अधोरेखित केली.

**'मराठी -ख'च्या माध्यमातून नव्या युगाशी नाते...**

डिजिटल तंत्रज्ञानामुळे संवादाची माध्यमे वेगाने बदलत आहेत. अशा परिस्थितीत मराठीला केवळ पारंपरिक वापरापुरते मर्यादित न ठेवता नव्या तंत्रज्ञानाशी जोडणे आवश्यक आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. 'मराठी -ख'च्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात मराठीचा प्रभावी वापर वाढविणे, डिजिटल माध्यमांवर मराठीतील माहिती आणि ज्ञानसामग्री उपलब्ध करून देणे, तसेच ओटीटी प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियावर दर्जेदार मराठी कंटेंट मोठ्या प्रमाणात निर्माण करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

**बोलीभाषांचा गोडवाही जपला पाहिजे...**

प्रमाण मराठीसोबतच महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषा हा मराठीचा अमूल्य ठेवा असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. कोकणी, वऱ्हाडी, खानदेशी-अहिराणी, मालवणी, डांगी, झाडीबोली यांसारख्या बोलीभाषांमध्ये स्थानिक संस्कृती, लोकपरंपरा आणि जीवनानुभव सामावलेले आहेत. त्यामुळे या बोलींचे साहित्य, लोकपरंपरा आणि भाषिक वैशिष्ट्ये जतन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

**पुढील विश्व मराठी साहित्य संमेलन लंडनमध्ये - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

आपली माय मराठी ही केवळ महाराष्ट्राची ओळख नाही, तर आपला स्वाभिमान आहे. संत ज्ञानेश्वरांपासून छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंतच्या समृद्ध परंपरेने नटलेली मराठी आता सातासमुद्रापार पोहोचली असून, जगभरात तिचा डंका वाजत आहे. भविष्यातही मराठीचा जागतिक विस्तार अधिक वेगाने व्हावा, यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. डिजिटल जगत, सोशल मीडिया, पॉडकास्ट, गेमिंग आणि कोडिंगसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्येही मराठीचा वापर वाढवून नव्या पिढीला मराठीशी जोडले पाहिजे. जगातील ५० हून अधिक देशांमध्ये मराठीचा प्रचार आणि प्रसार वाढविण्याचा संकल्प असून, लंडनमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी केंद्र' उभारण्याबरोबरच पुढील विश्व मराठी साहित्य संमेलनही लंडनमध्ये आयोजित केले जाणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. लंडनमध्ये सुमारे ७० ते ८० हजार मराठी बांधव वास्तव्यास असून, महाराष्ट्र मंडळाच्या माध्यमातून मराठीचे शिक्षण, अभ्यासक्रम आणि प्रमाणपत्र परीक्षांसारखे उपक्रम राबविले जात आहेत. लंडनमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी केंद्र' उभारण्याच्या दिशेनेही काम सुरू असून, महाराष्ट्र मंडळाची वास्तू खरेदी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

**लंडनमध्ये 'मराठी वैश्विक केंद्र', १०० बोलीभाषांचे कोश -उदय सामंत**

मराठी भाषा आणि संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि जागतिक पातळीवर विस्तार करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून, मराठीच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. पुण्यातील डेक्कन युनिव्हर्सिटीमध्ये मराठी भाषेसाठी 'उत्कृष्टता केंद्र', लंडनमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने 'मराठी वैश्विक केंद्र', राज्यातील विविध बोलीभाषांचे १०० कोश आणि नऊ ठिकाणी 'मराठी कौशल्य विकास केंद्र' उभारण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली.

**अभिजात मराठीच्या संशोधनासोबत डिजिटायझेशनवर भर, तरुणांनी मराठीच्या समृद्ध प्रवासात सक्रिय सहभागी व्हावे - सचिव किरण कुलकर्णी**

मराठी भाषेचा प्रवाह केवळ ज्ञानेश्वर महाराज किंवा चक्रधर स्वामी यांच्या काळापासून सुरू झालेला नसून, सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीच्या 'गाथा सप्तशती'पासून तिची समृद्ध परंपरा पुढे आलेली आहे. या प्रदीर्घ भाषिक वारशाचे संशोधन, जतन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत संक्रमण करण्यासाठी मराठी भाषा विभाग कटिबद्ध आहे, असे मराठी भाषा विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत ग्रंथ भेट देऊन करण्यात आले. यावेळी 'मराठीचे कौतुक भाग-२' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात आला.

# टपाल सेवेविषयीच्या तक्रारींसाठी १६ ऑक्टोबरला 'डाक अदालत'

**बीड । प्रतिनिधी**

**पोस्टल सेवा ही सामाजिक आर्थिक जीवनाचा अविभाज्य भाग असून, ग्राहकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा पोस्ट विभागाचा प्रयत्न असतो. मात्र सेवेदरम्यान काही त्रुटींमुळे तक्रार करण्याची वेळ येते. अशा तक्रारींचे निराकरण करण्यासाठी पोस्ट विभागातर्फे डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे.**

पोस्टमास्टर जनरल, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता ही डाक अदालत होणार आहे. छत्रपती संभाजीनगर क्षेत्राशी संबंधित टपाल सेवा, मनी ऑर्डर, बचत बँक खाते, प्रमाणपत्र इत्यादीबाबत ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांमध्ये झालेले नाही व समाधानकारक उत्तर मिळाले नाही, अशा तक्रारींची दखल या अदालतमध्ये घेतली जाईल. तक्रारदारांनी आपली तक्रार सविस्तर तपशिलासह - उदा. तारीख, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार पाठवली त्यांचे नाव, हुद्दा इ. सह दोन प्रतीत सहायक निदेशक, डाक सेवा (जन शिकायत), श्री. भगवान नागरगोजे, कार्यालय पोस्टमास्टर जनरल, छत्रपती संभाजीनगर - ४३१००२ यांच्या नावे दि. १४ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पोहोचेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. प्रपत्र http://www.maharashtrapost. gov. in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

# भारतीय डाक विभागातर्फे 'ढाई आखर' राष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

**भारतीय डाक विभागामार्फत राष्ट्रीय स्तरावर 'ढाई आखर' या शीर्षकाखाली पत्रलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, बीड डाक विभागातही या स्पर्धेचे आयोजन केले आहे.**

या स्पर्धेचा विषय '- Letter to Mother Earth : My Promise to Protect Nature' असा असून, पत्र कोणत्याही भाषेत लिहिता येणार आहे. ही स्पर्धा १८ वर्षांपर्यंत आणि १८ वर्षांवरील अशा दोन गटांमध्ये होणार आहे. पत्रामध्ये आपले नाव, पत्ता व वयाचा उल्लेख असावा. हे पत्र मुख्य पोस्टमास्टर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई जीपीओ, मुंबई - ४००००१ यांच्या नावे लिहून डाकघरातील विशेष टपाल पेटीत टाकायचे आहे. पाकिटातील पत्रासाठी १००० शब्द आणि अंतर्देशीय पत्रासाठी ५०० शब्दांची मर्यादा आहे. पत्र पाठविण्याची शेवटची तारीख ३१ ऑक्टोबर २०२६ आहे. राज्यस्तरावर निवडलेल्या उत्कृष्ट पत्रांसाठी अनुक्रमे २५,०००/-, १०,०००/- व ५,०००/- रुपयांचे पारितोषिक तर राष्ट्रीय स्तरावर अनुक्रमे ५०,०००/-, २५,०००/- व १०,०००/- रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन डाक अधीक्षक एस. एन. आंबेडकर, बीड विभाग यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ०२४४२-२२७०३५ या क्रमांकावर संपर्क साधावा.




मुंबई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस'निमित्त 'अभिजात मराठी भाषा सप्ताह २०२६'चे उदघाटन संपन्न झाले.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री उदय सामंत, मुंबईच्या महापौर रितू तावडे, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. हेमलता बागला व इतर मान्यवर उपस्थित होते.

# जिल्हा माहिती कार्यालयातील जुन्या वर्तमानपत्रांची रद्दी विक्रीसाठी उपलब्ध

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हा माहिती कार्यालय, बीड येथे उपलब्ध असलेल्या जुन्या वर्तमानपत्रांची रद्दी आहे त्या स्थितीत व आहे त्या स्वरूपात विक्री करण्यात येणार आहे. रद्दी खरेदी करण्यास इच्छुक व्यक्ती किंवा संस्थांना कार्यालयीन वेळेत कार्यालयात येऊन रद्दीची पाहणी करता येणार आहे.**

रद्दी खरेदी करण्यास इच्छुक व्यक्ती किंवा संस्थांनी प्रति किलो दर बंद लिफाफ्यात नमूद करून, आवश्यक कागदपत्रे तसेच संस्थेचा नोंदणी दाखला जोडून निविदा दरपत्रक सादर करावे. निविदा जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालयाच्या बाजूला, नगर रोड, बीड या पत्त्यावर दि. ७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे. रद्दी विक्रीसाठी प्राप्त दरपत्रक मंजूर अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, बीड यांना राहतील. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही, असे जिल्हा माहिती कार्यालयाने कळविले आहे.

# परडी माटेगाव येथे सेवा संकल्प अभियानास उत्साहात सुरुवात




**बीड । प्रतिनिधी**

**परडी माटेगाव (ता. वडवणी, जि. बीड) - ग्रामपंचायत परडी माटेगाव येथे सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला.**

या अभियानांतर्गत गावात आणि सार्वजनिक स्मशानभूमी परिसरात लोकसहभागातून भव्य ग्रामस्वच्छता अभियान राबवण्यात आले. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शाळेतील शिक्षक व विद्यार्थी तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत परिसराची स्वच्छता केली. गाव स्वच्छ तर आरोग्य सुरक्षित या संकल्पनेतून हे अभियान राबवण्यात येत असून, यापुढेही गावात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. स्मशानभूमी परिसरातील वाढलेले गवत, कचरा काढून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. या उपक्रमामुळे ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानामध्ये लातूर जिल्ह्यात ७४ अर्धन्यायिक प्रकरणांचा निपटारा



**लातूर । प्रतिनिधी**

**महसूल प्रशासनातील विविध अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या जमिनीशी संबंधित महसुली दाव्यांचा जलद आणि कायमस्वरूपी निपटारा करण्यासाठी लातूर जिल्ह्यात ३० ऑक्टोबर रोजी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये ७४ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.**

छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या निर्देशानुसार लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड आणि अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ३० सप्टेंबर २०२६ रोजी लातूर जिल्ह्यामध्ये मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) आणि अपर जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान आयोजित करण्यात आले. या महसूल लोक अदालतीमध्ये एकूण ७४ प्रकरणांचा दोन्ही पक्षकारांच्या संमतीने आणि तडजोडीने निपटारा करण्यात आला. महसूल विभागामार्फत अशा प्रकारच्या लोक अदालतीचे आयोजन यापुढेही नियमितपणे करण्यात येणार असून, नागरिकांनी आपली प्रलंबित प्रकरणे कायदेशीर चौकटीत राहून तडजोडीने निकाली काढण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

# मतदार यादी पुनरीक्षणात पात्र मतदारांचा समावेश करण्यावर भर

## विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांच्याकडून पदवीधर निवडणुकीच्या तयारीचा आढावा; बीडमध्ये १२७ मतदान केंद्रे प्रस्तावित

**बीड । प्रतिनिधी**

**मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण (डखठ) ही मतदारांना वगळण्याची नव्हे, तर पात्र मतदारांना यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया आहे, असे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी मतदार यादी पुनरीक्षण आणि औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला.**

जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांत २१.९३ लाख गणना अर्जांचे वाटप करण्यात आले असून, त्यापैकी १९.५३ लाख अर्जांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. उर्वरित २ लाख ४० हजार ४७७ मतदारांची नोंद संकलित न होणाऱ्या गटात आहे. दावे-हरकती दाखल करण्याची मुदत १२ ऑक्टोबर असून, १६ नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार असून, बीड जिल्ह्यात ५४ हजार २०६ पदवीधर मतदार आहेत. नवीन नोंदणीसाठी आलेल्या ४ हजार २६१ अर्जांपैकी २ हजार ६३० अर्ज मंजूर झाले आहेत. जिल्ह्यात १२७ मतदान केंद्रे प्रस्तावित असून, त्यापैकी ३२ केंद्रे बीड तालुक्यात असतील. मतमोजणी २७ ऑक्टोबरला होणार आहे. दरम्यान, निवडणूक आचारसंहितेच्या पहिल्या ७२ तासांत शासकीय, सार्वजनिक व खासगी मालमत्तांवरील विद्रूपीकरणाच्या सुमारे ४ हजार ८७४ प्रकरणांची नोंद झाली. त्यापैकी ४ हजार ६८५ ठिकाणी विद्रूपीकरण हटविण्यात आले आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विविध नियंत्रण कक्ष आणि नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

cmyk

शिव वाणी
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

क्रीडा,न्यायनिवाडा,
क्राईम घडामोडी...

सोमवार,दि.०५ ऑक्टोबर २०२६
Monday, Dt. 05-October-2026

# बीड जिल्ह्यात पोलिसांची धडक कारवाई; विविध गुन्ह्यांचा छडा

## अल्पवयीन मुलीची सुटका, घरफोडीतील फरार आरोपी जेरबंद; स्पा सेंटरवरील कारवाईसह तीन विद्यार्थी सुखरूप

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात पोलिसांनी विविध प्रकरणांत धडक कारवाई करत अल्पवयीन मुलीची सुटका, घरफोडीतील फरार आरोपीला अटक आणि स्पा सेंटरमधील अनैतिक व्यवसायाचा पर्दाफाश केला. दरम्यान, वसतिगृहातून निघून गेलेल्या तीन विद्यार्थ्यांचाही पोलिस, आरपीएफ व शाळा प्रशासनाच्या प्रयत्नांतून सुखरूप शोध लागला.**

पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलीचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथून शोध घेत सुटका केली. गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे २ ऑक्टोबर रोजी स्थानिक पोलिसांच्या मदतीने छापा टाकून मुलगी व आरोपीला ताब्यात घेण्यात आले. पुढील कारवाईसाठी दोघांना पिंपळनेर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. अंबाजोगाई शहरातील घरफोडी प्रकरणातील फरार आरोपी मंगलसिंग हिरासिंग बावरी यालाही स्थानिक गुन्हे शाखेने परळी रेल्वे पुलाजवळ सापळा रचून अटक केली. त्याच्याकडून १८ तोळे सोने आणि ७४३ ग्रॅम चांदी जप्त करण्यात आली. या गुन्ह्यात आतापर्यंत ४५ तोळे सोने व १ किलो ६०१ ग्रॅम चांदी जप्त झाली आहे. शहरातील नगर नाका परिसरातील स्पा सेंटरमध्ये सुरू असलेल्या अनैतिक व्यवसायावरही पोलिसांनी कारवाई केली. डमी ग्राहकाच्या मदतीने छापा टाकून दोन महिलांची सुटका करण्यात आली असून स्पा चालकाला ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अन्य दोन स्पा सेंटरची तपासणी करून नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १० जणांवर कारवाई करण्यात आली. दरम्यान, सिंधफाना वसतिगृहातून निघून गेलेले तेजस चव्हाण, दिनेश चव्हाण आणि अभिजित राठोड हे तीन विद्यार्थी परभणी रेल्वे स्थानकावर सुखरूप सापडले. माजलगाव पोलिस, आरपीएफ आणि शाळा प्रशासनाच्या अथक प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांचा शोध लागला. विद्यार्थी सुखरूप असल्याचे समजताच पालकांसह शाळा प्रशासनाने सुटकेचा निःश्वास सोडला.

### सिंधफाना वसतिगृहातील तीन विद्यार्थी सुखरूप सापडले

माजलगाव : सिंधफाना वसतिगृहातून निघून गेलेले तेजस चव्हाण, दिनेश चव्हाण आणि अभिजित राठोड हे तीन विद्यार्थी परभणी रेल्वे स्थानकावर सुखरूप सापडले. सायंकाळी सातच्या सुमारास त्यांचा शोध लागला. विद्यार्थी सुखरूप असल्याचे समजताच पालकांसह शाळा प्रशासनाने सुटकेचा निःश्वास सोडला. विद्यार्थ्यांच्या शोधासाठी माजलगाव पोलीस प्रशासन, आरपीएफ आणि शाळा प्रशासनाने तत्परतेने प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांचे तसेच आरपीएफचे शाळा प्रशासनाने आभार मानले.





### चिखली येथून अल्पवयीन मुलीची सुटका; आरोपी जेरबंद

बीड : पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलीचा बीड पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथून शोध घेत सुटका केली. या प्रकरणातील आरोपीसही पोलिसांनी ताब्यात घेतले. गुन्ह्याचा तपास हाती घेतल्यानंतर पोलिसांनी विविध ठिकाणी शोध घेतला. अखेर गोपनीय बातमीदाराकडून आरोपी व मुलगी चिखली येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार २ ऑक्टोबर रोजी स्थानिक पोलिसांच्या मदतीने छापा टाकून दोघांना ताब्यात घेण्यात आले. पुढील कारवाईसाठी त्यांना पिंपळनेर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

### अंबाजोगाई घरफोडीचा छडा; फरार आरोपी परळीत जेरबंद



अंबाजोगाई : अंबाजोगाई शहरातील घरफोडी प्रकरणातील फरार आरोपी मंगलसिंग हिरासिंग बावरी याला स्थानिक गुन्हे शाखेने परळी रेल्वे पुलाजवळ सापळा रचून अटक केली. त्याच्याकडून १८ तोळे सोने व ७४३ ग्रॅम चांदी जप्त करण्यात आली. या गुन्ह्यात आतापर्यंत ४५ तोळे सोने आणि १ किलो ६०१ ग्रॅम चांदी जप्त झाली आहे. २० सप्टेंबर रोजी बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम लंपास केली होती. या प्रकरणात यापूर्वी दोघांना अटक करून २७ तोळे सोने व ८५८ ग्रॅम चांदी जप्त करण्यात आली होती. फरार आरोपीचा तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे शोध घेऊन ३ ऑक्टोबर रोजी त्याला जेरबंद करण्यात आले.




### स्पा सेंटरच्या नावाखाली देहव्यापाराचा पर्दाफाश

बीड : नगर नाका परिसरातील स्पा सेंटरमध्ये सुरू असलेल्या देहव्यापाराचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने पर्दाफाश केला. पोलिसांनी दोन महिलांची सुटका करून स्पा चालक सोमदेव राजेंद्र भारती याला ताब्यात घेतले. घटनास्थळावरून रोख रक्कम व आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आले. ३० सप्टेंबर रोजी डमी ग्राहक व पंचांच्या मदतीने सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात झखढ- व बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच शहरातील अन्य दोन स्पा सेंटरची तपासणी करून नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी आणखी १० जणांवर कारवाई करण्यात आली.

# बीडमध्ये अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

## प्रतिबंधित गुटख्यासह पानटपरीवर गुन्हे, तर एका हॉटेलाचा परवाना निलंबित

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाने प्रतिबंधित अन्न पदार्थांविरोधात मोठी मोहीम उघडली असून, प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या निर्देशानुसार बीड शहरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला आहे. तसेच मानवी आरोग्याला घातक त्रुटी आढळून आल्यामुळे जालना रोडवरील एका चहा-नाश्ता सेंटरचा परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला आहे.**

२४ सप्टेंबर २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने बशीरगंज येथील 'जमील पान सेंटर'वर अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान पानटपरीवर प्रतिबंधित गोवा आणि बाओबाजी पानम मसाल्यासह ५ हजार ६०८ रुपयांचा गुटखा व पानमसाला जप्त करण्यात आला. याप्रकरणी पानटपरीचालक सैयद मुशरत अली सैयद हमीद अली आणि विक्रेता शेख तोहिद अफसर यांच्याविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशाच प्रकारची दुसरी कारवाई त्याच दिवशी जिल्हा रुग्णालयासमोर असलेल्या कमाणी जवळील एका चहा व भजीच्या ठेल्यावर करण्यात आली. या ठिकाणी तपासणी केली असता खाकी रंगाच्या पुठ्यामध्ये विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला. या प्रकरणी ठेला चालक शेख माजेद शेख खालेद याच्याविरुद्धही बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. या भागात अवैध व प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. दुसऱ्या एका कारवाईत, २७ जुलै २०२६ रोजी जालना रोडवरील साठे चौक येथील 'मे. अप्पा चहा नाश्ता सेंटर'ची अन्न सुरक्षा पथकाने तपासणी केली. या तपासणीदरम्यान आस्थापनेमध्ये उंदराची विष्ठा, कीटक प्रतिबंधक व्यवस्थेचा अभाव, पिण्याच्या पाण्याच्या तपासणीचा अहवाल नसणे, भांडी धुण्याच्या जागेवरच अन्न शिजवणे, नॉन-फूड ग्रेड पिशव्या व वृत्तपत्राचा वापर, अवैध कृत्रिम रंगांचा वापर आणि कामगारांचे तंबाखू सेवन यांसारख्या मानवी आरोग्यास अत्यंत घातक असलेल्या गंभीर त्रुटी निष्पन्न झाल्या. त्यामुळे अन्न सुरक्षा व मानके कायद्यांतर्गत या हॉटेलचा परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला आहे. सदरची ही धडक कारवाई छत्रपती संभाजीनगरचे सहआयुक्त (अन्न) श्री. करकाळे आणि अन्न व औषध प्रशासनाचे बीडचे सहायक आयुक्त नि. दि. मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी सी. सु. खंदारे व त्यांच्या पथकाने पार पाडली.

# जिल्हाधिकारी शेताच्या बांधावर ;पीक पाहणी करुन शेतकऱ्यांशी साधला संवाद

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत आज जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन शेतकऱ्यांसोबत संवाद साधला.**



जिल्हाधिकारी गौडा यांनी आज दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी माळीवाडा ता.छत्रपती संभाजीनगर, सराई ता.खुलताबाद, वारेगाव ता.फुलंब्री, चौका ता. छत्रपती संभाजीनगर या परिसराचा पाहणी दौरा केला . पिकांच्या स्थितीचे अवलोकन करुन त्यांनी यावेळी शेतकऱ्यांसोबत संवाद साधला. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार, तहसीलदार शिवानंद बिडवे तालुका कृषी अधिकारी छत्रपती संभाजीनगर, खुलताबाद, फुलंब्री व अन्य अधिकारी कर्मचारी आणि शेतकरी उपस्थित होते जिल्हाधिकारी गौडा शेतकऱ्यांशी संवाद साधतांना म्हणाले की, शेतकऱ्यांनी सकारात्मक राहून पंचनामे करण्याकामी शासकीय यंत्रणेला सहकार्य करावे. शासन आणि प्रशासन शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करण्यासाठी कटिबद्ध आहे. कुठल्याही पात्र शेतकऱ्याला लाभापासून वंचित ठेवले जाणार नाही. याची खात्री मी स्वतः करणार आहे. पिण्याच्या पाण्याचे साठ्यांमधील अनधिकृत पाणी उपसा बंद करून पिण्याचे पाणी संरक्षित केले जाईल आणि संबंधित यंत्रणेला योग्य ते आदेश दिले जातील असेही जिल्हाधिकारी गौडा यांनी आश्वासित केले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा व पाणी, टँकरद्वारे पाणीपुरवठा, चारा छावण्यांची आवश्यकता तसेच रोजगाराच्या उपलब्धतेबाबतही आढावा घेण्यात आला. पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई आणि शेतकऱ्यांच्या अडचणींचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या निकषांनुसार मदत व सवलती उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. पिकांची सद्यस्थिती, उत्पादनातील संभाव्य घट आणि शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या तातडीच्या उपाययोजनांचे मूल्यांकन करून संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, तसेच पाणी बचत, उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर आणि पर्यायी पिकांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, असे निर्देश देण्यात आले.

# कर्जमुक्ती योजनेला वेग; बीडच्या १.१० लाख शेतकऱ्यांना ९१८.५६ कोटींची मदत

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' अंतर्गत बीड जिल्ह्यातील अंमलबजावणी वेगाने सुरू आहे. ही योजना शासन निर्णय दिनांक ०२/०६/२०२६ रोजी जाहीर करण्यात आली असून, या योजनेतील काही निकषांमध्ये दिनांक १५/०७/२०२६ नुसार अंशता बदल करण्यात आला आहे. या योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समझोता (जढड) या घटकाच्या अंमलबजावणीसाठी बीड जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, महाराष्ट्र ग्रामीण बँक व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांनी २२,७२८ शेतकऱ्यांच्या पीक कर्जाची माहिती महाआयटी मार्फत विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली आहे.**

आधार प्रमाणीकरणाच्या सद्यस्थितीनुसार, पात्र ठरलेल्या थकीत शेतकऱ्यांपैकी १४,८८१२ शेतकऱ्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यापैकी २ ऑक्टोबर २०२६ पर्यंत १२,२६८६ शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून अद्याप २६,१२६ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण प्रलंबित आहे. ज्या शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे, त्यांनी त्वरीत जवळील 'आपले सरकार सेवा केंद्रावर' जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे, कारण आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतरच लाभ रक्कम थेट कर्जखात्यामध्ये वितरित केली जाईल. वितरित करण्यात आलेल्या मदतीच्या अनुषंगाने, मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या शुभहस्ते दिनांक १/१०/२०२६ रोजी झालेल्या कार्यक्रमात बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ५४२ कर्जदार शेतकऱ्यांच्या खात्यावर २.९२ कोटी रुपये जमा झाले आहेत. राष्ट्रीयकृत बँक व महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या ४,३१७० शेतकऱ्यांच्या खात्यावर ४२१.६५ कोटी रुपये जमा झाले आहेत. एकूण बीड जिल्ह्यातील ४,३७१२ शेतकऱ्यांच्या खात्यावर ४२४.५७ कोटी रुपये नवीन जमा झाले आहेत. आतापर्यंत तिन्ही हफ्ते मिळून बीड जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँक व ग्रामीण बँकेच्या १०४६२४ पीक कर्ज थकीत शेतकऱ्यांच्या खात्यावर ८८५.०७ कोटी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पीक कर्ज थकीत ६२५४ शेतकऱ्यांच्या खात्यावर ३३.४९ कोटी रक्कम जमा झालेली आहे. अशा प्रकारे बीड जिल्ह्यातील एकूण ११०८७८ थकीत पीक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर ९१८.५६ कोटी रुपये दिनांक २ ऑक्टोबर २०२६ (तीन हफ्ते मिळून) पर्यंत जमा झाले आहेत. योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना तातडीने पीक कर्ज वाटप करण्याबाबत सर्व बँकांना शासनामार्फत निर्देश देण्यात आले आहेत. सदर माहिती मा. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी, बीड व श्री. सतीश तोटावार, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# स्वाधार योजनेच्या नूतनीकरण अर्जासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

**इयत्ता ११ वी व त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये व त्यांना जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेता यावे, यासाठी सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड या कार्यालयामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येते. या योजनेतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील जे विद्यार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळण्यासाठी पात्र आहेत, परंतु पुरेशा जागांअभावी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांना त्यांचा घरभाडे खर्च व इतर खर्च भागविण्यासाठी सदर योजनेतून अर्थसहाय्य देण्यात येते. यामध्ये भोजनभत्ता, निवासभत्ता व निर्वाहभत्त्याचा समावेश आहे. जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपालिकेच्या हद्दीपासून ०५ किलोमीटरच्या आत असलेल्या महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयात शिकणा-या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात येते.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात लाभघेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या चालू शैक्षणिक वर्षात ऑनलाईन अर्ज नुतनीकरण (ठशपशुरश्र) करण्यासाठी दिनांक १५ ऑक्टोंबर, २०२६ या कालावधीपर्यंत अंतिम संधी देण्यात येत आहे. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी नुतनीकरण अर्ज सादर करताना मागील वर्षाचे गुणपत्रक व इतर आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे तसेच चालू शैक्षणिक वर्षातील अभ्यासक्रमाची माहिती अद्ययावत (णि-वरींश) करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी अर्ज नुतनीकरण (ठशपशुरश्र) केला होता व त्यांना स्वाधार योजनेचा लाभमिळाला होता, अशाच विद्यार्थ्यांना विद्यमान पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षात प्रथम वर्षाकरीता (छशु) अर्ज सादर केला होता व त्यांना स्वाधार योजनेचा लाभमिळालेला आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांनाही विहित मुदतीत नुतनीकरण अर्ज सादर करता येणार आहे. शासकीय वसतिगृह प्रवेशाकरीता अर्ज केलेल्या परंतू जागेअभावी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांनाच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ देण्यात येईल, याची दक्षता घ्यावी. विहित मुदतीत अर्ज सादर न केल्यास संबंधित विद्यार्थी स्वाधार योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी दिनांक १५ ऑक्टोंबर, २०२६ या कालावधीपर्यंत आपले नुतनीकरण अर्ज (ठशपशुरश्र) ऑनलाईन पद्धतीने भरून त्याबाबतची कागदपत्रे हार्डकॉपीसह विहित वेळेत सहायक आयुक्त, समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगररोड, बीड या कार्यालयात सादर करण्याचे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांनी केले आहे.

## क्रीडा विश्वातील ताज्या घडामोडी...



### भारतीय महिला हॉकी संघाचा सुवर्णवेध

नवी दिल्ली : भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संघाचे अभिनंदन करून या यशाचे कौतुक केले. तब्बल चार दशकांहून अधिक काळानंतर भारतीय महिला हॉकी संघाने आशियाई स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले आहे. या कामगिरीमुळे महिला हॉकीकडे देशाचे पुन्हा लक्ष वेधले गेले असून, प्रशिक्षण, फिटनेस, संघातील समन्वय आणि आक्रमक खेळाच्या जोरावर भारतीय संघाने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली आहे. तळागाळातील प्रतिभावंत खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना वैज्ञानिक प्रशिक्षण देण्यावरही केंद्र सरकारकडून भर दिला जात आहे.

### अवैध जनावर वाहतुकीला कत्तलीशी थेट जोडता येणार नाही

नवी दिल्ली : अवैध पद्धतीने जनावरांची वाहतूक केल्याच्या प्रत्येक प्रकरणाला थेट कत्तलीच्या उद्देशाशी जोडता येणार नाही, असा महत्त्वाचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. केवळ वाहतुकीचे नियम मोडले म्हणून कत्तल प्रतिबंधक कायद्यांतील कठोर तरतुदी लागू करता येणार नाहीत. कत्तलीचा हेतू असल्याचे ठोस पुरावे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या भूमिकेमुळे गुन्हा नोंदविताना तपास यंत्रणेला वाहतुकीतील उल्लंघन आणि कत्तलीचा प्रत्यक्ष हेतू या दोन्ही बाबी स्वतंत्रपणे तपासाव्या लागणार आहेत. निर्णयाचा पशुधन वाहतूक व कत्तल प्रतिबंधक कायद्यांतील कारवाईवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

### बॉक्सिंगमध्ये भारताला सलग सुवर्णपदके

नवी दिल्ली : आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय बॉक्सिंगपटूंनी दमदार कामगिरी करत तीन सुवर्णपदकांची कमाई केली. अंकुशने पुरुषांच्या ८० किलो, परवीनने महिलांच्या ६५ किलो, तर लव्हलिना बोर्गोहेनने महिलांच्या ७५ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले. या यशामुळे भारतीय बॉक्सिंगला मोठी चालना मिळाली असून, विशेषतः महिला बॉक्सिंगपटूंच्या कामगिरीमुळे नव्या पिढीतील खेळाडूंना प्रेरणा मिळणार आहे.



### 'वन नेशन, वन इलेक्शन' बैठकीपासून सुप्रीम कोर्ट दूर

नवी दिल्ली प्रतिनिधी : 'वन नेशन, वन इलेक्शन' घटनादुरुस्ती विधेयकाचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीची सर्वोच्च न्यायालयातील ६ ऑक्टोबरची प्रस्तावित भेट रद्द करण्यात आली. मुख्य न्यायाधीश व अन्य न्यायाधीशांशी अनौपचारिक संवादाचा प्रस्ताव होता. मात्र वरिष्ठ न्यायाधीशांनी अशी भेट आवश्यक किंवा उचित नसल्याचे मत व्यक्त केल्याने हा निर्णय घेण्यात आला. लोकसभा व विधानसभांच्या निवडणुका एकाचवेळी घेण्याच्या प्रस्तावाचा समितीकडून घटनात्मक व प्रशासकीय पातळीवर अभ्यास सुरू आहे.

### 'वन नेशन, वन इलेक्शन' बैठकीपासून सुप्रीम कोर्ट दूर

नवी दिल्ली प्रतिनिधी : 'वन नेशन, वन इलेक्शन' घटनादुरुस्ती विधेयकाचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीची सर्वोच्च न्यायालयातील ६ ऑक्टोबरची प्रस्तावित भेट रद्द करण्यात आली. मुख्य न्यायाधीश व अन्य न्यायाधीशांशी अनौपचारिक संवादाचा प्रस्ताव होता. मात्र वरिष्ठ न्यायाधीशांनी अशी भेट आवश्यक किंवा उचित नसल्याचे मत व्यक्त केल्याने हा निर्णय घेण्यात आला. लोकसभा व विधानसभांच्या निवडणुका एकाचवेळी घेण्याच्या प्रस्तावाचा समितीकडून घटनात्मक व प्रशासकीय पातळीवर अभ्यास सुरू आहे.




### कृषी : रब्बी पिकांच्या एमएसपीमध्ये मोठी वाढ

नवी दिल्ली : केंद्र सरकारने रब्बी विपणन हंगाम २०२७-२८ साठी सहा प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने हा निर्णय घेतला. करडईच्या एमएसपीमध्ये प्रतिक्विंटल ६७५, मोहरी-रॅपसीडमध्ये ४१३, मसूरमध्ये ३९०, बार्लीमध्ये १३६, हरभऱ्यात ८३ आणि गव्हात २५ वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीमुळे रब्बी हंगामातील पीक नियोजनाला शेतकऱ्यांना वाढीवएमएसपीचा आधार मिळणार आहे. कडधान्ये व तेलबियांचे उत्पादन वाढविण्याच्या उद्देशानेही या निर्णयाकडे पाहिले जात आहे. मात्र, एमएसपी जाहीर होणे आणि प्रत्यक्ष सरकारी खरेदी होणे या वेगळ्या बाबी असल्याने शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी खरेदी यंत्रणेची कार्यक्षमता महत्त्वाची ठरणार आहे.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड, बीड जि. बीड- ४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं. १०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122 (MAHARASHTRA) (JURIDICTION AT BEED)